# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# नागपूर विभागीय मंडळ,नागपूर -४४०००१

दुरध्वनी कार्यालय इ.पी.बी.एक्स.०७१२-२५६५४०३, २५६०२०९,२५५३४०१,२५५३३६० फॅक्स२५६१७७५
वेबसाइट-www.nagpureduboard.in
इ मेल -msboardnagpur@gmail-com

पत्र क्रं.नाविम/गो.स./2024
नागपूर दिनाक 05/06/२०१८

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
नागपूर विभाग, नागपूर

विषयः-फेब्रुवारी / मार्च व जुलै / ऑगस्ट २०१९ च्या माध्यमिक शांलात प्रमाणपत्र व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेकरीता केंद्रसंचालक/सहाय्यक परिरक्षक यांच्या नेमणुका करण्यासाठी अद्यावत माहिती सादर करण्याबाबत.

फेब्रुवारी / मार्च व जुलै / ऑगस्ट २०१९ च्या माध्यमिक शांलात प्रमाणपत्र व,उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेकरीता केंद्रसंचालक/ सहाय्यक परिरक्षक नेमणूकीसाठी आपल्या आस्थापनेवरील सर्व शिक्षकांच्या सेवाजेष्ठतेप्रमाणे पुढील निकषानुसार त्यांच्या नावाची शिफारस करावी.

१) **महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी ( सेवेच्या शर्ती ) नियमावलीतील १९८१ च्या अनुसूची "ज"नुसार विभागीय मंडळाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी केंद्रसंचालक/ सहाय्यक परिरक्षक म्हणुन काम करणे अनिवार्य आहे. तसेच मंडळाने त्या परीक्षांच्या संदर्भात विहीत केलेल्या नियमानुसार कार्यक्षमता वा शिस्त राखणे याबाबत मुख्याध्यापक / प्राचार्य जबाबदार राहातील.**
**आपण या कामात नकार दिल्यास आपण मंडळ नियमावलीतील तरतुदीचा भंग करत आहात असे गृहीत धरुन आपणाविरुध्द संस्थेला कारवाई करण्याचे निर्देश देण्यात येतील व आपल्या शाळेची / कनिष्ठ माहिवद्यालयाचा मंडळ सांकेताक गोठविण्याची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

२) ज्या माध्यमिक शाळेस कनिष्ठ महाविद्यालय संलग्न आहे व एकच व्यक्ती मुख्याध्यापक /प्राचार्य, आहे अशा केंद्रावर माध्यमिक परीक्षेकरीता केंद्रसंचालक म्हणुन मुख्याध्यापक/ प्राचार्याची नियुक्ती करण्यात येईल व उच्च माध्यमिक परीक्षेकरीता पर्यवेक्षक/कनिष्ठ महाविद्यालयाचे सेवाजेष्ठ शिक्षक यांची केंद्रसंचालक म्हणुन नेमणूक करण्यात येईल या प्रमाणे इयत्ता १० वी / इ. १२ करीता केंद्रसंचालकांच्या नियुक्ती करीता नावे पाठवावी.

३) केंद्रसंचालक/ सहाय्यक परिरक्षक पदासाठी सेवाजेष्ठतेनुसार अनुभवी शिक्षकांची शिफारस करावी. शिफारस करतांना जवळचा नातेवाईक ( **भाऊ/ बहिण/ मुलगा/ मुलगी / पत्नी / पती)** **किंवा स्वतः तुरळक विषय ( Isolated subject )** घेऊन त्या परीक्षेला प्रविष्ठ होत असल्यास त्यासंबधी उल्लेख करावा.